वेतन अग्रिम

विदेशी प्रशिक्षणासाठी जाणा-या अधिकारी/
कर्मचारी यांना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.टीआरएन-1197/प्र.क्र.125/97/12-अ
मंत्रालय, मुंबई 400 032.

GR1997090401

दिनांक ४ सप्टेंबर, १९९७

वाचा : शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-1076/885/टीसी, दि.28.11.77

शासन परिपत्रक :

राज्य शासनातर्फे दरवर्षी विविध योजनांतर्गत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना विदेशी प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविले जाते.शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण 1076/885/टी.सी, दिनांक 28.11.77 अन्वये विदेशी प्रशिक्षणासाठी जाणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना एक महिन्याचे वेतन अग्रिम म्हणून देण्याबाबत व प्रशिक्षणा नंतर ते तीन टप्प्यात वसूल करण्याबाबतची तरतूद परिपत्रकातील अ.क्र.13 येथील सूचनेमध्ये नमूद आहे.त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत व वेतन अग्रिमात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

2. उपरोक्त दिनांक 28.11.77 च्या शासन परिपत्रकातील अ.क्र.13 येथील सूचना खालील प्रमाणे बदलण्यात येत आहेत :-

"13. विदेशी प्रशिक्षणासाठी जाणा-या अधिकारी/कर्मचारी यांना खालील अटींना अधीन राहून प्रशिक्षण कालावधीचे संपूर्ण वेतन अग्रिम म्हणून देण्यात यावे.

1. विदेशी प्रशिक्षणाचा कालावधी हा किमान तीन महिन्यांचा असणे आवश्यक आहे.

2. सदरहू विदेशी प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित अधिकारी/कर्मचारी त्याच्या कुटुंबा समवेत प्रशिक्षणासाठी जात असल्यासच वेतन अग्रिम अनुज्ञेय ठरेल.

3. वेतन अग्रिमाची मर्यादा प्रशिक्षणाच्या कालावधीतील वेतनापुरती मर्यादित असेल परंतु वेतन अग्रिमाची कमाल मर्यादा एक वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीपुरती मर्यादित राहील.

4. वेतन अग्रिमाचा खर्च प्रशिक्षणार्थी अधिकारी/कर्मचारी ज्या कार्यालयात प्रशिक्षणापूर्वी कार्यरत असतील त्या कार्यालयानेच त्यांचा वेतन व भत्ते यांचा खर्च, वेतन व भत्ते संदर्भात संबंधीत असलेल्या लेखाशिर्षाखाली भागवावा व प्रशिक्षणाच्या कालावधीनंतर प्रशिक्षण कालावधीतील वेतनात तो (एकरकमी) समायोजित करावा.

5. सदरहू प्रशिक्षणार्थी अधिकारी/कर्मचारी अस्थायी असल्यास त्यांनी वेतन अग्रिमासंदर्भात स्थायी अधिकारी /कर्मचारी यांचा जामिन (Surety) देणे आवश्यक राहील.

3. जे अधिकारी/कर्मचारी तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधीसाठी प्रशिक्षणावर जाणार आहेत (कुटुंबासह किंवा विना-कुटुंबासह) व जे अधिकारी /कर्मचारी तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी प्रशिक्षणावर विना-कुटुंब जाणार आहेत त्यांना येथील एक महिन्याचे वेतन अग्रिम अनुज्ञेय राहील

1\. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण 1076/[illegible] असे समजण्यात यावे.
सूचना 13 ही वरील परिच्छेद क्र.2 व 3 मधील बदलाप्रमाणे सुधारीत झाली असे समजण्यात यावे.

हे शासन परिपत्रक वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. 3454/प्र.स.(वि) दिनांक 25.8.97 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सुनिल पोरवाल)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

महालेखापाल- 1 (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल -1 (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल - 1 (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल -2 (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व भारतीय प्रशासन सेवा अधिकारी,
वित्त विभाग
गृह विभाग/पोल-1
महसूल व वन विभाग
निवड नस्ती,